रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

गुरुवार, दि. 27 फेब्रुवारी 2020

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मातृभाषा दिवस व मराठी राजभाषा दिनानिमित्त**

**'मराठी भाषा गौरव दिन'**

# अहवाल

'सामान्य माणसांच्या बोलीभाषांमध्ये समाजाला सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करण्याचे सामर्थ्य असते. आज एकविसाव्या शतकात मराठीसह जगातील सर्वच भाषा संक्रमणातून जात आहेत. अशा काळात बोलीभाषांचा मृत्यू मोठ्या प्रमाणात होत आहेत. प्रदेशनिष्ठ संस्कृती टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य बोलींमध्ये असते. तेव्हा बोलींचे संवर्धन करणे हेच एकविसाव्या शतकातील आव्हान असणार आहे. असे प्रतिपादन मराठीतील नामवंत लेखक व कथाकथनकार हिम्मत पाटील यांनी केले.

मराठी भाषा पंधरवडा, मातृभाषा दिवस व मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजीत 'मराठी भाषा गौरव दिन सोहळ्यात' ते बोलत होते. ते पुढे म्हणाले जोपर्यंत शेतकरी शेती पिकवत राहील तोपर्यंत त्या त्या प्रदेशातील बोली जिवंत राहतील. कृषिसंस्कृतीची स्वत:ची स्वतंत्र भाषिक व्यवस्था आहे. केवळ एक बैलगाडी नष्ट झाली तरी बैलगाडीसंदर्भांतील शेकडो शब्द नष्ट होतील. प्रमाण भाषा समृद्ध करण्यात बोलींचे मोठे योगदान असते.

मातृभाषेत ज्ञान उपलब्ध करून दिले तर खऱ्या अर्थाने शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोचहण्यास मदत होईल. असे प्रतिपाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी आपल्या अध्यक्षिय मनोगतात केले. या सोहळ्यानिमित्त मराठी विभागाच्यावतीने 'जागर' या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. विद्याधर पाटील, उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, संदिप नाझरे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. तेजस चव्हाण तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती (Outcome)**

विद्यार्थी भाषिक दृष्ट्या सजग झाला.

लाभार्थी : 73







विभागप्रमुख

प्राचार्य

Principal
Arts, Science & Commerce College,
Ramanandnagar (Burli)

# 'मराठी भाषा गौरव दिनाचे काही क्षणचित्रे


























रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली



दिनांक २२ फेब्रुवारी २०२०


## मराठी विभाग

मातृभाषा दिवसानिमित्त निबंध स्पर्धा

मराठी विभाच्या वतीने नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत ढवळी येथील राष्ट्रीय जलतरणपटू सागर पाटील कनिष्ठ महाविद्यालामध्ये मातृभाषा दिनाचे औचित्य साधून निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयक सजग जागृतता निर्माण व्हावी या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

निष्पत्ती :
विद्यार्थ्यांना बोलीभाषेचे व मातृभाषेचे महत्त्व कळाले.
महाविद्यालया व्यतिरिक्त बाह्य संकुलातील विद्यार्थ्यांना सहभागी होता आले.

लाभार्थी संख्या : १००









प्रमुख
मराठी विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)